


परळी
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...
# संघर्षनेता



https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे

बीड | वर्षे- 10 वे | अंक क्र. 255 | रविवार दि. 05 ऑक्टोबर 2025 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060


# गावागावात यंदा राजकीय दिवाळी! झेडपी, पंचायत समिती निवडणुकांचा बार दिवाळीतच फुटणार




सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकी जानेवारी 2026 पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार राज्य निवडणूक आयोगाने नियोजन करायला सुरुवात केली आहे. मार्च 2022 पासून राज्यात महापालिका, नगरपालिका अशा स्थानिक स्वराज्य संस्थांवर प्रशासकराज सुरु आहे. पहिल्या टप्प्यात जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका आणि नगर परिषद यांच्या निवडणुका होतील असे म्हटले जात आहे. ऐन दिवाळीमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका असतील अशी माहिती आयोगातील सूत्रांनी दिली आहे.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी प्रत्येक पक्षाने मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. सध्या नगरपरिषद आणि नगरपालिका यांच्या पान 3 वर

# कुणबीचे चुकीचे दाखले दिल्यास अधिकाऱ्यांवर कारवाई; मुख्यमंत्र्यांचे आदेश

## चंद्रशेखर बावनकुळेंनी दिली माहिती



मुंबई : मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या निर्णयावरून ओबीसी समाजात निर्माण झालेला संभ्रम दूर करण्यात आला असून, बनावट प्रमाणपत्रे देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल आणि त्यांनाच जबाबदार धरले जाईल, असे स्पष्ट आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्याची माहिती महसूलमंत्री व ओबीसी (OBC) मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे (Chandrashekhar bawankule) यांनी दिली. तसेच, राज्यातील पूरस्थिती लक्षात घेता 10 ऑक्टोबर रोजी होणारा मोर्चा मागे घेण्याची विनंतीही मुख्यमंत्र्यांनी ओबीसी शिष्टमंडळाला केल्याचे त्यांनी सांगितले. ओबीसी शिष्टमंडळासोबत सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, पर्यावरण आणि वातावरण बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, इतर मागास व बहुजन कल्याण दुग्धविकास मंत्री अतुल सावे, काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार आणि ओबीसी संघटनांचे सुमारे 40 प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीनंतर महसूलमंत्री बावनकुळे यांनी माध्यमांना माहिती दिली. पान 3 वर

# आज ठळक

## आजच्या बौद्ध धम्म रॅलीत जास्तीत जास्त बौद्ध बांधवांनी सहभागी व्हावे- बालासाहेब जगतकर



परळी प्रतिनिधी. आजच्या बौद्ध धम्म रॅलीत जास्तीत जास्त बौद्ध बांधवांनी सहभागी व्हावे असे आवाहन बालासाहेब जगतकर यांनी केले आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की परळी शहरातील भीम नगर जगतकर गल्ली येथील सुगंध कुटी बुद्ध विहार येथे आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा या कालावधीमध्ये किल्लारी येथील पूज्य भंते धम्मसार थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली वर्षावास अधिष्ठान चालू होता या तीन महिन्याच्या कालावधीमध्ये भीम नगर येथील 90 उपासकांनी रोज भंते धम्मसार थेरो यांचं भोजनदान व सायंकाळी सामूहिक खीरदान करण्याचं काम येथील या 90 उपासकाने केला असून त्याचा समारोप आज दिनांक 5 ऑक्टोबर 2025 रोजी भव्य अशा धम्म रॅलीने होणार असून या धम्म रॅली ची सुरुवात सकाळी ठीक दहा वाजता बसवकल्याण येथील पूज्य भंते धम्मनाग महाथेरो यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करून होणार असून लगेच भंते व श्रमनेर संघास भोजनदान देण्यात येणार असून यानंतर धम्मदेशना व भंते धम्मसार थेरो यांना एक चार चाकी वाहन दान देण्यात येणार आहे तसेच अकरा वाजता धम्मा रॅली सुरुवात होऊन त्यानंतर सामूहिक भोजनदान होणार आहे

या रॅलीत उंट घोडे पारंपारिक वाद्य अशी भव्य ऐतिहासिक धम्म रॅली निघणार असून या धम्म रॅलीत परळी परिसर व शहरातील सर्व श्रद्धावान बुद्ध उपासक-उपासिकांनी पांढरे वस्त्र परिधान करून या रॅलीत सहभागी व्हावे असे आवाहन बालासाहेब जगतकर यांनी केले आहे.

# पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी व्हीसीद्वारे सहभाग घेऊन केले सर्व उमेदवारांचे अभिनंदन!

## जालन्यात 128 अनुकंपा उमेदवारांना शासन नियुक्तीचे आदेश वितरित





जालना ।दिनांक 04। मुख्यमंत्री महोदयांच्या 150 दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस प्राप्त लिपिक-टंकलेखक संवर्गातील एकुण 128 उमेदवारांना आज शासकीय नियुक्ती आदेशाचे वितरण करण्यात आले. राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा जिल्हयाच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी व्हीसीद्वारे यात सहभाग घेऊन शासकीय नोकरी मिळालेल्या सर्व उमेदवारांचे अभिनंदन केले आहे.

अनुकंपा नियुक्ती प्रक्रियेस गती आणून पात्र उमेदवारांना रोजगार उपलब्ध करून देणे हा प्रमुख उद्देश असलेल्या या कार्यक्रमांतर्गत अनुकंपा नियुक्ती (गट-क व गट-ड) उमेदवार व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस प्राप्त लिपिक- टंकलेखक संवर्गातील एकुण 128 उमेदवारांना नियुक्ती आदेशाचे वितरण आज जिल्हाधिकारी कार्यालयात मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी एकुण 128 उमेदवारांचे शासकीय नोकरीचे स्वप्न साकार झाले, असा सुर कार्यक्रमातून उमटला.

अनुकंपा व लिपीक भरती नियुक्ती आदेश वितरणाचा जिल्हास्तरीय कार्यक्रम पान 3 वर

# बाळासाहेब ठाकरेंच्या मृत्यूवरुन आरोप करणारे रामदास कदम नीच-अनिल परब



बाळासाहेब ठाकरेंच्या मृत्यू प्रकरणात रामदास कदम यांनी जे आरोप उद्धव ठाकरेंवर केले त्यानंतर आता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे हा पक्ष आक्रमक झाला आहे. अनिल परब यांनी पत्रकार परिषद घेऊन शिवसेनेची भूमिका मांडली. रामदास कदम यांनी नीचपणा केला आहे असं अनिल परब म्हणाले.

"रामदास कदम यांनी दसऱ्याच्या मेळाव्यात नीचपणा केला आहे. याला नीच हाच एक शब्द लागू होतो. या आरोपांचं उत्तर देण्याची गरज आम्हाला वाटत नव्हती. कारण पोरीबाळी नाचवून आणि त्यांची दलाली खाऊन बोलणाऱ्यांना आम्ही उत्तर द्यावं एवढी त्यांची लायकी नाही. पण आमच्या दैवताच्या म्हणजेच बाळासाहेबांच्या मृत्यूबाबत त्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे त्यामुळे मी उत्तर देतो." असं अनिल परब म्हणाले आणि त्यांनी रामदास कदम यांच्या आरोपांना उत्तर दिलं. बाळासाहेबांच्या अंतिम क्षणी मी 24 तास तिथे होतो. त्यामुळे सगळ्या घटनांचा मी साक्षीदार आहे. प्रत्येक वेळी, पान 3 वर


# ट्रक चालकाने 37 लाखांची 28 टन हळद पळवली

## चालकाविरोधात अंबाजोगाई पोलिसात गुन्हा दाखल



अंबाजोगाई, (-छत्रपती संभाजी नगर येथील व्यापाऱ्याने अंबाजोगाई तालुक्यातील लोखंडी सावरगाव येथून एका ट्रकमध्ये हळद भरुन सोलापुरला पाठविली होती. या ट्रकमध्ये 28 टन हळद होती. सदरील हळद चालकाने सोलापुरला न नेता इतर ठिकाणी लंपास केल्याचा प्रकार व्यापाऱ्याच्या निदर्शनास आल्यानंतर सदरील व्यापाऱ्याने याबाबत अंबाजोगाई पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. पान 3 वर

# बौद्ध धम्म रॅलीत जास्तीत जास्त बौद्ध बांधवांनी सहभागी व्हावे;संयोजन समिती




परळी प्रतिनिधी. आजच्या बौद्ध धम्म रॅलीत जास्तीत जास्त बौद्ध बांधवांनी सहभागी व्हावे असे आवाहन संयोजन समिती यांनी केले आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की परळी शहरातील भीम नगर जगतकर गल्ली येथील सुगंध कुटी बुद्ध विहार येथे आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा या कालावधीमध्ये किल्लारी येथील पूज्य भंते धम्मसार थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली वर्षावास अधिष्ठान चालू होता या तीन महिन्याच्या कालावधीमध्ये भीम नगर येथील 90 उपासकांनी रोज भंते धम्मसार थेरो यांचं भोजनदान व सायंकाळी सामूहिक खीरदान करण्याचं काम येथील या 90 उपासकाने केला असून त्याचा समारोप आज दिनांक 5 ऑक्टोबर 2025 रोजी भव्य अशा धम्म रॅलीने होणार असून या धम्म रॅली ची सुरुवात सकाळी ठीक दहा वाजता बसवकल्याण येथील पूज्य भंते धम्मनाग महाथेरो यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करून होणार असून लगेच भंते व श्रमनेर संघास भोजनदान देण्यात येणार असून यानंतर धम्मदेशना व भंते धम्मसार थेरो यांना एक चार चाकी वाहन दान देण्यात येणार आहे तसेच अकरा वाजता धम्मा पान 3 वर




# ज्ञान आणि साहित्यसेवेतील अर्धशतक : प्रा. डॉ. राजकुमार यल्लावाड



आयुष्याच्या वाटेवर अनेक व्यक्ती भेटत असतात. अशा व्यक्तींचं भेटणं आपल्या आयुष्याला आकार देऊन जातं.वास्तवात काटेरी वाटेवरून वाटचाल करत असताना आपल्याला अशा व्यक्तीचे भेटणं म्हणजे एक नंदनवनच . . .आयुष्याचं शोकांत गीत संपून आनंदगीत सुरु होणं होय.आयुष्यात असा आनंदाचा प्रवास वाट्याला आणून देणारी काही माणसं कायमची लक्षात राहतात. माझ्या आयुष्याच्या अशाच एका वळणावर प्रा. डॉ. राजकुमार यल्लावाड सरांची भेट झाली.समुद्रातील लाटांवर हिंदळत असणाऱ्या दिशाहीन ओंडक्याप्रमाणे आमचं आयुष्य सैरभैर झालं होतं...तिमिरात भरकटलं होतं.अशा घनगर्द तिमिरात ज्यांनी आशेचा किरण दाखवला,जीवनाला दिशा दिली. ते माझ्यासाठी आनंदयात्री ठरले.माझ्या व इतर बऱ्याच जणांच्या जीवनात हे आनंदाचे क्षण पेरणाऱ्या सरांचा आज पन्नासावा वाढदिवस त्यांच्यासाठी आणि आमच्यासाठीही आनंदाचा क्षण ...साहित्य सेवेला वाहून घेऊन, शारदेच्या प्रांगणात, ज्ञानदानाची अखंड ज्योत तेवत ठेवणाऱ्या एका शिक्षकाचा, संशोधकाचा, प्रखड वक्त्याचा, सामाजिक कार्यकर्त्याचा, अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा हा सुवर्ण महोत्सवी अभिष्टचिंतन सोहळा आहे. आपल्या जीवन प्रवासातील पन्नास वर्षाची सुवर्णगाठ मोठ्या दिमाखाने ते आज पूर्ण करत आहेत. ज्ञानदानाचे वृत्त, साहित्य सेवेची निष्ठा आणि सामाजिक कार्याची बांधिलकी जपणाऱ्या सरांचे अर्धशतकी पदार्पण हे खऱ्या अर्थाने एका समर्पित प्रवासातील मैलाचा दगड आहे.

पैसा हा माणसाच्या आयुष्याचा स्थायीभाव झाला आहे. माणसं पैशाच्या मागे लागून आयुष्याचं वाळवंट करतात. सरांनी आयुष्यभर माणसाची रुजवण करून माणसांचं पीक उभं केलं आहे. पैशापेक्षा माणसं जास्त कमावली आहेत. त्यांच्या संपर्कात येणारा प्रत्येक व्यक्ती त्यांच्या गोड आणि लाघवी स्वभावामुळे कायमचा जोडला जातो. माझ्या बाबतीतील सरांचा अनुभव असाच आहे.माजी आणि सरांची पहिली भेट साधारणतः 2013 मध्ये प्रा. व्यंकट गित्ते यांच्या माध्यमातून झाली. तो ऋणानुबंध कायम जपत आलो आहोत. ज्याप्रमाणे एखादी नदी डोंगर माथ्यावर उगम पाऊन पुढे ती दगड-धोंड्यातून, कड्या- कपारीतून, काट्या-कुट्यातून, चढ-उतारातून, अनेक अडथळे पार करून विशाल, अथांग सागराला भेटते व समर्पित भावनेने सागरमय होऊन जाते त्याप्रमाणे आम्ही सरांचेच होऊन गेलो. त्याला कारणीभूत त्यांच्या स्वभावातील स्वभाव विशेष हे होत.त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील विशेष आपल्याला त्यांच्याकडे आकर्षित करतात.काही काही बाबतीत तर त्यांना दैवी देणगीच लाभली आहे.सरांचं वक्तृत्व, अध्ययन-अध्यापन, सकारात्मक विचार, सूत्रसंचालन शैली, हसतमुख चेहरा, कार्यमग्नता, कार्यतत्परता हे गुण नेहमी डोळ्यासमोर ठेवून मी चालण्याचा प्रयत्न करत असतो.

सरांचा जीवनप्रवास हाही सोपा नव्हताच. त्यांच्याही वाट्याला बालपणापासून संघर्षाचे आणि परिस्थितीशी दोन हात करण्याचे अनेक प्रसंग आले. अठराविश्व दारिद्र्य ज्यांच्या पाचवीला पुजले होते,अज्ञान आणि गरिबी हातात हात घालून ज्यांच्या कुटुंबात चिरंतर नांदत होती अशा शेतकरी किशनराव यल्लावाड यांच्या घरी 05 ऑक्टोबर 1975 मध्ये सरांचा जन्म झाला. त्यांचे बालपण खूप हालाखीत गेले. त्यांचे प्राथमिक शिक्षण उदगीर तालुक्यातील कासराळ या अतिदुर्गमअशा छोट्याशा खेडेगावातील जिल्हा परिषद शाळेत झाले. आई-वडिलांनी दारिद्र्याशी दोन हात करत मुलांना शिकवले. आपल्या आई-वडिलांच्या कष्टाची आणि परिस्थितीची जाण व भान ठेऊन त्यांनी उच्च शिक्षणासाठी गाव सोडले. उदगीर येथील हावगीस्वामी महाविद्यालयातून उच्च शिक्षण पूर्ण केले. शिक्षणासाठीची ओढाताण, वेळप्रसंगी उपासमार अशा जीवनाच्या भट्टीत सरांचे व्यक्तिमत्त्व अधिक तावून सुलाखून निघाले. त्यामुळेच त्यांच्या ठिकाणी सतत माणुसकीचा झरा निरंतर वाहताना दिसून येतो. परिस्थिती माणसाला शिकवत असते त्याचबरोबर घडवतही असते. या परिस्थितीच्या रेट्याने सरांना शिक्षणाचा लळा लावला. मराठी विषयात एम.ए., बीएड् , सेट, पीएच्. डी. सारख्या अतिउच्च पदव्या संपादन केल्या. बावीस वर्षापूर्वी कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय, परळी-वैजनाथ येथे मराठी विषयाचे प्राध्यापक म्हणून रुजू झाले.गेल्या बावीस वर्षापासून अध्यापनाबरोबरच मराठवाडा साहित्य परिषदेच्या माध्यमातून सांस्कृतिक, सामाजिक चळवळी सोबतच ज्ञानदानाचा यज्ञ अहर्निशी धगधगत ठेवण्याचे कार्य सरांकडून चालू आहे.

सरांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे अनेक गुणांचा सुरेख संगम आहे. केवळ अध्ययन-अध्यापनच नव्हे तर त्याशिवाय काहीतरी पृथगात्म करावं ही त्यांची भूमिका. त्यांचा पिंड हा चळवळीतील कार्यकर्त्यांचा असल्यामुळे नेहमी मराठवाडा साहित्य परिषदेच्या माध्यमातून साहित्यिक व सांस्कृतिक चळवळ गतिमान करण्यात त्यांनी मोलाची भूमिका पार पाडली आहे. विविध कार्यक्रमाचे आयोजन, नियोजन आणि कार्यक्रमाची यशस्वीता हाच विचार नेहमी मनात असतो. यासाठी वेळप्रसंगी नव्हे, तर नेहमीच अंगमेहनती बरोबरच पदरमोड सहन करताना मी सरांना पाहिले आहे. सर हे केवळ वर्गापुरते मर्यादित नाहीत, तर ते व्यासपीठावर उभे राहताच कार्यक्रमात रंगत भरणारे उत्कृष्ट सूत्रसंचालक आहेत. त्यांच्या सूत्रसंचालनामध्ये हजारोंचा श्रोतावर्ग खिळवून ठेवण्याची क्षमता आहे. आपल्या अमोघ वाणीने आणि अभ्यासपूर्ण मांडणीने संपूर्ण महाराष्ट्रभर परखड, निर्भीड वक्ता म्हणून त्यांनी ओळख निर्माण केली आहे. आजपर्यंत साधारणतः 600 पेक्षा जास्त कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन आणि 300 पेक्षा अधिक विविध विषयावर व्याख्याने झाली आहेत. त्यांच्या सर्व भाषणातून त्यांचे भाषिक प्रभुत्व आणि अभ्यासातील सखोलता सिद्ध होताना दिसून येते. त्यांची वाणी म्हणजे श्रोत्यांना मंत्रमुग्ध करणारा अमृताचा वर्षावच असतो. त्यांनी महाराष्ट्रातील अनेक प्रसिद्ध उद्योजक, साहित्यिकांच्या मुलाखती घेऊन महाराष्ट्रातील मराठी श्रोत्यांना अनेक विचारांची मेजवानी मिळवून दिली आहे.

सरांचे पन्नासाव्या वर्षात पदार्पण हे वयाबरोबरच, त्यांच्या लेखनाची आणि वैचारिक मांडणीची परिपक्वता सातत्याने केल्या जाणाऱ्या लेखनातून वाचकांना जाणवत असते. सरांनी आजपर्यंत विविध मराठी दैनिकातून प्रासंगिक लेख लिहून त्या-त्या विषयाची सखोल मांडणी करून न्याय देण्याचे काम केले आहे. त्यांची समीक्षात्मक पुस्तक परीक्षणे आणि हृदयस्पर्शी भाव कविता नियमितपणे वाचकांचे चित्त आकर्षित करत असतात. त्यांची लेखणी ही समाजमनावर विचारांचे संस्कार करणारी आहे. त्यांच्या लेखणीतून 'साहित्य विचार', 'मुद्रित माध्यम लेखन तंत्र व कौशल्य', 'व्यावसायाभिमुख भाषिक लेखन कौशल्य माहिती व तंत्रज्ञान', 'वस्तुनिष्ठ मराठी', 'सृजनामृत', 'कादंबरी आकलन आणि आस्वाद', 'साहित्यसौंदर्य' इ. ग्रंथाचे संचित वाचकांच्या हाती आले आहे.

सर आज पन्नासाव्या वर्षात पदार्पण करत असले, तरी त्यांची कार्यमग्नता, कार्यतत्परता, उत्साह आणि सातत्य तरुणांना लाजवणारे आहे. त्यांचे लेखन, वाचन, चिंतन, मनन अविरतपणे चालू असते. सरांच्या अनेक शोधनिबंधाचे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय चर्चासत्रातून, कार्यशाळेतून, जर्नल्समधून वाचन, प्रकाशन झाले आहे. सरांनी अनेक विद्यार्थ्यांना विद्यादान करण्यात कुठेच कंजुषपणा केला नाही. सरांच्या या कार्याबद्दल नेहमी मला एक संस्कृत सुभाषित आठवत असते. "न चोरहार्य न च राजहार्य, न भ्रातृभाज्य न च भारकारि | व्यये कृते वर्धते एक नित्य, विद्याधन सर्वधनप्रधानम् ||" याचा अर्थ 'जे चोर चोरू शकत नाही, राजा हिरावू शकत नाही, भावांमध्ये ज्याचे वाटप होत नाही, जे ओझे वाटत नाही, खर्च केल्यावर ते नेहमी वाढतच राहते ते विद्याधन हे सर्व धनामध्ये श्रेष्ठ आहे. अशा धनाचा अविरत वाटप करणारा कुबेर अशी उपमा सरांना समर्पकपणे लागू पडते. त्यांनी आजपर्यंत सात विद्यार्थ्यांना पीएच्. डी. च्या सर्वोच्च शिखरावर पोहोचवले आहे;आणि आज आठ नवे संशोधक विद्यार्थी त्यांच्या मार्गदर्शनाखाली ज्ञानसाधनेत, संशोधनाच्याकार्यात लीन आहेत.

सरांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा एक महत्त्वाचा गुण म्हणजे सरांचं काव्य लेखन होय. सरांच्या अनेक कवितेने श्रोत्यांना मोहिनी घातली आहे. सरांच्या कवितेने नेहमीच सामाजिक प्रश्नांना मुखर करण्याचे काम केले आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, उदगीर येथे निमंत्रित कवी म्हणून कवितेचे सादरीकरणही त्यांनी केले आहे. मराठवाडा साहित्य संमेलनात निमंत्रित कवी आणि परिसंवादक म्हणून सहभाग नोंदवला आहे. आकाशवाणी, बीड केंद्रावरुन त्यांचे काव्यवाचन प्रसारित झाले आहे. अशा हळव्या मनाच्या कवीचा पन्नासावा अभिष्टचिंतन सोहळा आणि त्या निमित्ताने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध कंगोरे उलगडून दाखवण्याचा माझा हा अल्पसा लेखन प्रपंच . . .

सरांनी आजपर्यंत ज्या क्षेत्रात पदार्पण केले तेथे आपल्या व्यक्तिमत्त्वाने आणि अभ्यासपूर्ण कर्तृत्वाने स्वतःची ओळख निर्माण केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळावर सलग दोन वेळा बहुमताने निवड होणे हा त्यांच्या कर्तृत्वावर ठेवलेला विश्वास दर्शवतो. त्यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या धर्तीवर विद्यापीठ अभ्यासक्रमाची रचना करताना त्यांच्या अभ्यासातील, वाचनातील सर्वस्पर्शता आणि सखोलता यांची जाणीव होते. त्यामुळेच विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा, आवडीचा विचार करून एक सर्वसमावेशक अभ्यासक्रम तयार करण्यात आला. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना विविध विद्यापीठांच्या शैक्षणिक समित्यांवर काम करण्याची संधी मिळाली.

सरांना वयाचे बंधन कधीच आडवे आले नाही. सर सतत नाविन्याच्या शोधात असतात. सरांनी कोरोनाच्या काळातील आपला वेळ सत्कारणी लावला. स्वतःच ते चांगल्या प्रकारचे तंत्रस्नेही शिक्षक झाले. तंत्रज्ञानाचा उपयोग करून आज ते महाराष्ट्रातील प्रत्येक मराठी विद्यार्थ्यापर्यंत जाऊन पोहोचले आहेत. तसेच ब्लॉग लेखन सुरु करून त्यांनी विविध विषयावरील अभ्यासपूर्ण लेखन केले आहे. 'अक्षरगंध' नावाने स्वतःचे युट्यूब चैनल चालू केले आहे. त्या माध्यमातून विविध विषयावरील व्हिडिओ विद्यार्थ्यापर्यंत पोहोचवली आहेत. तसेच काव्य गायन, वाचनाच्या कार्यक्रमाच्या व्हिडिओ क्लिप अपलोड करून श्रोत्यांपर्यंत पोहोचवून आपल्या लोकप्रियतेत भर पाडली आहे.साहित्यिक ,सामाजिक,सांस्कृतिक, शैक्षणिक व तंत्रस्नेही अशा विविधांगी कार्यामुळे त्यांची लोकप्रियता वाढताच गेली आहे.त्याचाच परिपाक म्हणून त्यांना अनेक पुरस्काराने सन्मानित केले गेले आहे.

आपल्या कृती, उक्तीतून ज्ञान आणि संस्काराचे बीज रोवणाऱ्या एका तपस्वीच्या सुवर्ण महोत्सवी अभिष्टचिंतन सोहळ्याच्या या शुभप्रसंगी त्यांच्या पुढील ज्ञान यात्रेस आणि साहित्यसेवेस माझ्याकडून आणि माझ्या परिवाराकडून हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!! त्यांना दीर्घ आयुरारोग्य लाभो ही प्रभू वैजनाथाच्या चरणी प्रार्थना !!

शुभेच्छुक

**प्रा. डॉ. सूर्यकांत हरिश्चंद्र गित्ते**
**भगवान बाबा कला व वाणिज्य महाविद्यालय, लोणार. जि. बुलढाणा.**
**मो. नं. 9423775742**

# घाटी नवरा – कोंकणी बायको (भाषेची मज्जा)

**डॉ. दशरथ भोसले**

आम्ही मुळचे कोकणातील म्हणजे आमचे गाव रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुका, खोपी गाव. माझे आई–वडिलांचे बालपणापासून पुण्यात आयुष्य गेलेले. कोकणात गावी येणे–जाणे नाही. माझाही जन्म पुण्यातच झालेला. बालपण, शिक्षण, नोकरीही पुण्यातच. कोकणात कधी येणे–जाणे नाही. नियतीच्या मनात काही वेगळेच असावे, याचा प्रत्यय लवकरच आला. दिनांक 1 जून 1969 रोजी माझे लग्न झाले. माझी पत्नी सौ. मंगल हिची आई लहानपणीच वारली. त्यामुळे कोकणातील दापोली येथे मोठ्या बहिणीकडे राहावे लागले. प्राथमिक शिक्षण दापोली येथे झाले.

पत्नी लग्नानंतर पुणे येथे आमच्या घरी राहू लागली. मला आता रत्नागिरीला गावी जावे वाटू लागले. आमच्या लग्नातील देवकार्यासाठी वापरलेले नारळ व काही साहित्य गावातील श्रीराम मंदिराचे पुजारी यांच्याकडे देण्याची प्रथा आहे. आमच्या गावात जंगम पुजारी असतात. त्यांना आम्ही 'बुवा' म्हणतो. लग्नानंतर थोड्या उशीराने मी गावी येऊन सदर साहित्य बुवांकडे दिले. मग वडिलांनी सांगितल्याप्रमाणे मी आमच्या मुळ घरी गेलो. कुळस्वामीनीचे दर्शन घेतले. माझ्या आईने दिलेली भेट माझ्या वयस्कर चुलतीला दिली. चुलतीच्या पाया पडलो. चुलतीने गालावर हात फिरवून आशीर्वाद दिला. मी चुलतीच्या समोर बसलो. चुलती मला म्हणाली, "मुला, मंगलाला का आणले नाहीस?" मी म्हणालो, "नाही आणली." काकू मला म्हणाली, "बावा, मंगलाने वायली केली." मी थोडासा रागाने बोललो, "अहो काकू, लग्नाला महिना नाही झाला, ती वायली कशाला करेन? काकू, आम्ही दोघे एकत्रच राहतो. वायले–वायले राहत नाही. काकू, तुम्हाला कोणी सांगितले आम्ही वायले राहतो?" तेवढ्यात ओटीवर बसलेले चुलते हसत आत आले. त्यांच्या लक्षात आले, आपला पुतण्या शब्दाचा अर्थ न कळाल्यामुळे गडबडला आहे. चुलते मला म्हणाले, "बावा, काकूने तुला काय विचारले? मंगलाने वायली केली का? अरे बावा, याचा अर्थ मंगलाने वांगी लावली आहेत का. वायली म्हणजे गावी वांग्यांना म्हणतात. तू पक्का पुणेरी भामटा निघालास, वायली शब्दाचा पुणेरी अर्थ वेगळा तुझ्या डोक्यात आला." मी पुण्याला आल्यावर घरी आई–वडील, भावंडांना हा प्रकार सांगितला. अजूनही कधी कधी वायली शब्दाची आठवण आली की हसू अनावर होते.

पत्नीला पुण्याची हवा मानवेना. ती सारखी आजारी असायची. पत्नीची तोळामासा तब्येत बघून माझ्या आई–वडिलांनी मला सांगितले, "दापोलीत तुला नोकरी मिळणार आहे. तू पत्नी आणि मुलासह दापोलीला सुखाने संसार कर. आमची काळजी करु नकोस. तुझा धाकटा भाऊ आमची काळजी घेईल." माझ्या जीवनाचा नवीन अध्याय सुरु झाला. जन्मभूमी पुणे मला सोडावी लागली. दापोली माझी कर्मभूमी झाली. कार्यालयामार्फत कर्मचारी वसाहतीत एक रुम मिळाली. चोवीस तास पाणी, लाईट, फॅन – सगळ्या सुविधा होत्या. आजूबाजूला भरपूर मोकळी जागा, पत्नीने भाजीपाला लावायला सुरुवात केली. इथे बरेच जण चुलीवर जेवण करायचे. गॅसची सुविधा अजून सुरु झाली नव्हती. संसार सुखात सुरु झाला. पत्नीच्या कोकणी बोलीभाषेने मी बरेच वेळा गोंधळून जायचो.

रविवार सुट्टीचा दिवस. मी बाजारात जायला निघालो. पत्नी मला म्हणाली, "येतांना दोन कवटं आणा." मी बाजारात फिरलो. भाजीवाल्याकडे चौकशी केली. घरी आलो, पत्नीला म्हणालो, "बाजारात मला कवटं मिळाली नाहीत. पुण्यात महाशिवरात्रीच्या वेळेस कवठ फळे विकायला येतात. चेंडूप्रमाणे गोल फळ असते. कवच टणक असते. ते फोडून आतील गरात गूळ टाकून उपवासाला खातात." पत्नीच्या ज्ञानात भर पडली. माझे अज्ञान उघडे पडले. पत्नीने सांगितले, "कोकणात अंड्याला आम्ही कवटं बोलतो."

आज रविवार आहे, तर येतांना गोयला घेऊन या. मी दापोलीत नुकताच आलो होतो. फारशी कोणाशी ओळख नव्हती. गावातील किराणा मालाचे 'विविध वस्तू भांडार' दुकान आहे.

या दुकानातील सदूभाऊ जोशी ओळखीचे होते. त्यांना मी म्हणालो, "सदूभाऊ, मला एक गोयला द्या." दुकानातील सर्वजण हसले. पण गोयला म्हणजे काय हे कोणी सांगितले नाही. ते म्हणाले, "गावातील मारुतीच्या देवळाजवळ रस्त्यावर मिळेल." मी घरी आलो. पत्नीला म्हणालो, "मला गोयला काही मिळाला नाही." "आपला नवरा बावळटच दिसतो" असा चेहरा तिने केला. थोड्या वेळाने पत्नीने आवाज दिला, "ए बयो, इकडे ये." मी पाहिले, त्या बाईच्या डोक्यावर चुलीत वापरण्यासाठी लाकडे होती. माझी हसून पुरेवाट झाली. पत्नीला म्हणालो, "याला आम्ही 'मोळी' किंवा 'भारी' म्हणतो."

असा बरीच वर्षे आमचा संसार सुरु आहे. मी काय म्हणतो पत्नीला कळत नाही. पत्नी काय म्हणते मला कळत नाही. असा 'आंधळी कोशिंबीर' सारखा कधी गंमतीचा, कधी रुसणे–फुगणे असा गंमतीदार संसार सुरु आहे. पत्नीने सांगितले, "काढणे घेऊन या." गोयला शब्दावरून 'विविध वस्तू भांडारात' सर्वजण हसले म्हणून त्या दुकानात न जाता, मानभावीपणे सायकलने गावभर फिरुन घरी आलो. पत्नीला सांगितले, "गावातील सगळ्या रस्त्यावरुन फिरुन आलो, मला काही 'काढणे' मिळाले नाही." माझे अज्ञान प्रगट करून पत्नीला विचारले, "'काढणे' म्हणजे काय ते सांग." निर्विकार चेहऱ्याने पत्नीने सांगितले, "विहिरीतून पाणी काढण्यासाठी एक डबा असतो. त्याला तार लावलेली असते. तारेला दोरी बांधून विहिरीतून पाणी काढता येते." मग माझे ज्ञान पाजळले. पत्नीला म्हणालो, "अगं, पुण्यात आम्ही त्याला पोहरा म्हणतो."

पत्नी म्हणाली, "माझी तब्येत बरी नाही, मी 'लकटते'." मी ऐकले 'लटकते'. मी घाबरुन म्हणालो, "ए बाई, तू लटकून मला काय फाशी देण्याचा विचार करतेस का?" हसून पत्नी म्हणाली, "मी कशाला लटकू? 'लकटते' म्हणजे वाईच पडते, झोपते." मी हसून म्हणालो, "आम्ही दुपारच्या झोपण्याला 'वामकुक्षी' असा शुद्ध सदाशिव पेठी शब्द वापरतो."

दिवाळी आली होती. पत्नी मला म्हणाली, "तुम्ही टोप आणा." मी सांगितले, "मला टोपाची गरज नाही. माझ्या डोक्यावर केस भरपूर आहेत." मी 'टोप' म्हणजे 'विग' समजलो. मग पत्नीने एक पातेले दाखवले. तसे आणायचे होते. 'भानशार' म्हणजे चुलीजवळ भांडी उतरवण्यासाठी वापरले जाणारे फडके.

अशा घाटी–कोकणी भाषेतील गंमती–जंमती मजा घेत गेली बावन्न वर्षे आमचा संसार सुरु आहे. दोघांच्याही ज्ञानात नवीन शब्दांची भर पडत आहे.



**डॉ. दशरथ भोसले**
**विनोदी कथा लेखक, दापोली जिल्हा रत्नागिरी.**

# केज शहरात 'धम्मचक्र प्रवर्तन दिन' उत्साहात साजरा



केज प्रतिनिधी/ प्रकाश मुंडे*:- केज शहराच्या विविध भागांमध्ये धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या पवित्र मुहूर्तावर तथागत गौतम बुद्ध आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करण्यात आले. समानता, न्याय आणि बंधुत्वाचा संदेश देणाऱ्या या दिनानिमित्त केज शहरातील नागरिकांमध्ये मोठा उत्साह दिसून आला.

या कार्यक्रमाला नगराध्यक्षा सौ. सिताताई बनसोड मॅडम यांची विशेष उपस्थिती लाभली. दीप प्रज्वलन करून मान्यवरांनी महामानवांना मानवंदना दिली.

*नगराध्यक्षांनी स्पष्ट केले धम्माचे महत्त्व*

यावेळी बोलताना नगराध्यक्षा सौ. सिताताई बनसोड यांनी धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे महत्त्व स्पष्ट केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेऊन समानता, न्याय आणि बंधुत्वावर आधारित समाजरचनेचा संदेश दिला. बुद्ध आणि त्यांचा धम्म आजही संपूर्ण मानवजातीला शांतता आणि प्रगतीचा मार्ग दाखवतो, असे महत्त्वपूर्ण विचार त्यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी भारतीय बौद्ध महासभेचे केज तालुका अध्यक्ष बालासाहेब जोगदंड सर, शिवाजी हजारे सर, गोपाळ मस्के,लखन हजारे, अशोक गायकवाड, योगेश गायकवाड,निखिल समुद्रे, संदिपान गायकवाड, गालफाडे तात्या, लक्ष्मणराव वाघमारे, सुदेश सिरसट,प्रेमजित हजारे,बबलू साखरे, कवी गायकवाड,शरद धिवार,धिरज मस्के, हनुमंत शिंदे,एम. डी. घुले, महादेव गायकवाड, शेखर सिरसट, धनराज भालेराव, धनराज सोनवणे, लता भडके, विठ्ठल जाधव, विष्णू समुद्रे, शेखर गायकवाड, अंजली गायकवाड यांच्यासह अनेक मान्यवर आणि महिला मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

# अंगावर पोल पडून एकाचा मृत्यू

केज : विजेचे खांब उभे करीत असताना बाजूला थांबलेल्या एकाच्या अंगावर खांब पडल्याने मृत्यू झाला असल्याची दुःखद घटना घडली आहे. दिनांक 2 ऑक्टोबर रोजी केज तालुक्यातील नाव्होली येथे रस्त्याच्या कडेला गुत्तेदारा मार्फत विजेचे खांब उभे करीत असताना पोल उभे करण्याच्या मशीनची लोखंडी साखळी तुटून त्याला लटकलेला विजेचा खांब बाजूला उभे असलेले बाबासाहेब दादाराव बिक्कड वय (60 वर्ष) यांच्या अंगावर पडला.त्या अपघातात बाबासाहेब बिक्कड हे जखमी झाले. त्या नंतर त्यांना उपचारासाठी दवाखान्यात दाखल करण्यात आले होते. दरम्यान दि. 3 ऑक्टोबर रोजी उपचारा दरम्यान बाबासाहेब बिक्कड यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी अद्याप गुन्हा दाखल झालेला नाही. बाबासाहेब बिक्कड यांच्या मृत्यूमुळे हळहळ व्यक्त होत आहे.

# दसरा मेळावा सावरगाव घाट : युवा नेते सुरज भैय्या घुले यांच्या भव्य नियोजनाची चर्चा !!

प्रकाश मुंडे/ केज प्रतिनिधी :- भगवान भक्ती गडावर दरवर्षीप्रमाणे यंदाही पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीत झालेल्या दसरा मेळाव्याला प्रचंड जनसागर उसळला. हा मेळावा रेकॉर्डब्रेक गर्दीचा ठरला असून, यामध्ये येवता जिल्हा परिषद सर्कल मधील युवा नेते सुरज भैय्या घुले यांच्या उत्कृष्ट नियोजनाची आणि सक्रिय सहभागाची विशेष चर्चा होत आहे.



3,000 भाविकांसाठी भव्य भोजन व्यवस्था!

युवा नेते सुरज भैय्या घुले यांनी पहिल्यांदाच या मेळाव्यात जवळपास तीन हजार (3,000) भाविकांसाठी भव्य भोजन व्यवस्थेचे आयोजन करून एक वेगळाच ठसा उमटवला. आपल्यासोबत असणाऱ्या कार्यकर्त्यांबरोबरच इतर भाविकांसाठीही त्यांनी उत्तम प्रतीच्या भोजनाची व्यवस्था उभी केली, ज्यामुळे त्यांची संघटनशक्ती आणि कार्यकर्त्यांप्रतीची आस्था दिसून आली.

200 गाड्यांचे प्रभावी नियोजन

यासोबतच, येवता जिल्हा परिषद सर्कलमधून मेळाव्यासाठी येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी सुरज भैय्या घुले यांनी जवळजवळ 200 गाड्यांचे प्रभावी ये-जा व्यवस्थेचे नियोजन केले. या नियोजनामुळे भाविकांच्या प्रवासात मोठा दिलासा मिळाला आणि मेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहणे शक्य झाले.

पंकजाताईंच्या कार्यावर निष्ठा आणि सामाजिक सक्रियता

सुरज भैय्या हे नामदार पंकजाताई मुंडे यांच्या कार्यावर प्रचंड निष्ठा ठेवणारे चेहरा म्हणून पुढे येत आहेत. त्यांचे सातत्यपूर्ण सामाजिक व राजकीय उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग आणि उत्कृष्ट संघटनात्मक टीमवर्क यामुळे ते लोकांच्या मनात घर करून राहिले आहेत.

यंदाचा दसरा मेळावा सुरज भैय्यांच्या सक्रिय सहभागामुळे विशेष गाजला असून, आता या तरुणाला राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात पुढे कोणत्या संधी मिळतात, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

**हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com**

# पाकिस्तानची कूटनीती आणि कारवाया

**डॉ. भारत कऱ्हाड**

---

पाकिस्तान हा 1947 साली निर्माण झाल्यापासूनच दक्षिण आशियातील भू-राजकारणात एक महत्त्वाचा घटक राहिला आहे. त्याच्या कूटनीतीचा गाभा प्रामुख्याने भारतविरोधी भूमिकेतून विकसित झाला असून, त्यातूनच त्याच्या कारवायांची दिशा ठरलेली दिसते. काश्मीरचा मुद्दा, धार्मिक अतिरेकी गटांना मिळालेला पाठिंबा आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वतःची प्रतिमा घडविण्याचा केलेला प्रयत्न या सर्वांनी पाकिस्तानच्या परराष्ट्र धोरणाला विशिष्ट स्वरूप दिले आहे.

पाकिस्तानच्या कूटनीतीचा पहिला आधारस्तंभ म्हणजे भारताविरोधी धोरण. स्वातंत्र्यानंतर लगेचच काश्मीरच्या प्रश्नावरून भारताशी युद्ध छेडले गेले आणि तेव्हापासून आजवर हा मुद्दा पाकिस्तानच्या सर्व राजकीय व कूटनीतिक हालचालींच्या केंद्रस्थानी आहे. 1965 आणि 1971 च्या युद्धांमध्ये झालेला पराभव आणि 1999 मधील कारगिल युद्धातील अपयश यांनी पाकिस्तानच्या लष्करी रणनीतीचे अपयश उघड केले. तरीदेखील पाकिस्तान सतत काश्मीरचा प्रश्न आंतरराष्ट्रीय पातळीवर उपस्थित करीत राहतो.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे अतिरेकी गटांना मिळालेला खुला किंवा आडवा पाठिंबा. तालिबान, लष्कर-ए-तोयबा, जैश-ए-मोहम्मद यांसारख्या संघटनांना पाकिस्तानच्या भूमीवर वाढवले गेले, त्यांना शस्त्रसाठा आणि प्रशिक्षण पुरवले गेले. भारतात झालेल्या अनेक दहशतवादी हल्ल्यांचा उगम पाकिस्तानमध्ये झाल्याचे पुरावे वारंवार समोर आले आहेत. 26/11 चा मुंबई दहशतवादी हल्ला याचेच सर्वांत मोठे उदाहरण मानले जाते.

आंतरराष्ट्रीय मंचावर पाकिस्तानने स्वतःला "दहशतवादाचा बळी" म्हणून सादर करण्याचा प्रयत्न केला आहे. 9/11 नंतर अमेरिकेच्या दहशतवादविरोधी युद्धात पाकिस्तानने सहकार्य दाखवले, पण प्रत्यक्षात "चांगले दहशतवादी" आणि "वाईट दहशतवादी" असा भेद करून दुहेरी धोरण राबवले. अफगाणिस्तानात तालिबानला अप्रत्यक्ष आधार देत असतानाच अमेरिका आणि नाटो देशांकडून आर्थिक व लष्करी मदत मिळवत राहणे, ही पाकिस्तानच्या कूटनीतीची खासियत ठरली.

पाकिस्तानची अर्थव्यवस्था सतत अस्थिरतेच्या गर्तेत आहे. कर्जाचे ओझे, महागाई, बेरोजगारी यामुळे देशांतर्गत असंतोष वाढला आहे. त्यामुळे कूटनीतीतून आंतरराष्ट्रीय निधी मिळवणे, IMF वर्ल्ड बँकसारख्या संस्थांकडून मदत उकळणे, ही पाकिस्तानची गरज बनली आहे. चीनबरोबरची जवळीक याचाच एक भाग आहे. चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉर (CPEC) हा प्रकल्प पाकिस्तानसाठी आर्थिक प्रगतीची संधी आहे, परंतु त्यातून चीनच्या कर्जाच्या जाळ्यात अडकण्याचा धोका देखील वाढला आहे.

दुसऱ्या बाजूला पाकिस्तान अरब जगताशी धार्मिक आणि आर्थिक संबंध टिकवून ठेवतो. सौदी अरेबिया, यूएई यांसारख्या देशांमधील लाखो पाकिस्तानी कामगार आणि त्यातून मिळणारा प्रचंड परकीय चलनाचा ओघ हा पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेचा आधारस्तंभ आहे. मात्र, अलीकडच्या काळात या देशांनी भारताशीही धोरणात्मक जवळीक साधल्यामुळे पाकिस्तानची अडचण वाढली आहे.

संयुक्त राष्ट्रसंघात पाकिस्तान वारंवार काश्मीरचा मुद्दा उपस्थित करतो, पण त्याला मोठा पाठिंबा मिळत नाही. अमेरिका आणि युरोपियन देशांनीही दहशतवादाबाबत पाकिस्तानवर दबाव वाढवला आहे. पाकिस्तान फाटलेल्या प्रतिमेला लपवण्यासाठी मानवी हक्कांचे मुद्दे, काश्मीरातील स्थिती इत्यादींचा उपयोग करतो, परंतु जगभरात त्याची विश्वासार्हता प्रश्नांकित ठरली आहे.

अलीकडच्या काळात पाकिस्तानची अंतर्गत स्थितीही अधिक अस्थिर झाली आहे. राजकीय अस्थिरता, लष्कराची सर्वसत्ताधारी भूमिका, न्यायव्यवस्थेवरचा दबाव आणि पत्रकारितेवरील बंधने यामुळे आंतरराष्ट्रीय प्रतिमा अधिकच मलीन झाली आहे. इम्रान खान यांच्या सत्तेतून बाहेर काढल्यानंतर निर्माण झालेला गोंधळ हे त्याचेच द्योतक आहे.

संपूर्णतः पाहता पाकिस्तानची कूटनीती ही भारतविरोधी अजेंड्याभोवती फिरत आली आहे. दहशतवादाला पाठिंबा, दुहेरी धोरण, चीनकडील आर्थिक अवलंबित्व आणि अरब जगतातील संतुलन राखण्याचा प्रयत्न, या सर्वांनी त्याचे धोरणे गुंतागुंतीची केली आहेत. मात्र, जागतिक स्तरावर वाढती दहशतवादविरोधी भावना, भारताशी अनेक देशांचे वाढते संबंध आणि पाकिस्तानमधील अंतर्गत राजकीय-आर्थिक संकट यामुळे त्याची स्थिती दिवसेंदिवस कठीण बनत चालली आहे.

**डॉ. भारत कऱ्हाड**
**प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

## पान 1 वरुन

मतदार यादीची कार्यक्रम जाहीर झाला. यानंतर आरक्षण ठरवले जाणार आहे. यादरम्यान जिल्हा परिषदांच्या आरक्षणाचा कार्यक्रम देखील जाहीर झाल्याचे म्हटले जात आहे. या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका पहिल्या टप्प्यात घेतल्या जातील.महानगरपालिकांच्या वॉर्ड रचनेचा विषय अजून ठरलेला नसल्याने या मनपा निवडणुका डिसेंबर-जानेवारी या महिन्यात होतील असे म्हटले जात आहे. दिवाळीमध्ये पहिल्या टप्प्यातील निवडणुका होतील. निवडणुकीसाठी आवश्यक मनुष्यबळ, ईव्हीएमसह इतर सोयीसुविधा लक्षात घेऊन निवडणुकींचा कार्यक्रम तयार केला जाईल, असे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले. स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी राज्यभरात तब्बल 9 कोटी 80 लाख मतदार आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर राज्यातील सर्व राजकीय पक्षांचे भविष्य ठरणार असल्याने सर्वांनी निवडणुकीची जोरदार तयारी केली आहे.नगर पंचायत, नगर परिषद आणि नगर पालिका यांच्या नगराध्यक्षांची निवड सामान्य जनतेमधूनच होणार आहे. सरकारच्या वतीने नगराध्यक्षांच्या आरक्षणाची सोडत काढण्यात आली आहे. 2019 नंतर राज्यात सत्ताबदल झाल्यानंतर नगराध्यक्षांची निवड ही बहुमताने झाली होती. यात पुन्हा बदल करण्यात आला असून स्थानिक स्वराज्य संस्थांचे नगराध्यक्ष हे सर्वसामन्यांमधून निवडले जातील हे स्पष्ट झाले आहे.राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाजिल्हा परिषदा - 32पंचायत समित्या - 331महापालिका - 29 नगरपालिका-नगरपरिषदा - 289

---

बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना बावनकुळे म्हणाले, "मराठा-कुणबी प्रमाणपत्राच्या जीआरचा कुणीही गैरफायदा घेऊ नये व बनावट प्रमाणपत्रे दिली जाऊ नयेत, यावर सरकार आणि शिष्टमंडळ यांचे एकमत झाले आहे. बैठकीत मंत्री छगन भुजबळ यांनी काही अधिकाऱ्यांनी खोटे दाखले दिल्याचे पुरावे सादर केले. यावर, 'जर एखाद्या अधिकाऱ्याने खोटे प्रमाणपत्र दिले, तर त्याला तो अधिकारीच जबाबदार असेल आणि त्याच्यावर कडक कारवाई केली जाईल,' असे मुख्यमंत्र्यांनी निक्षून सांगितले आहे." या बैठकीत केवळ प्रमाणपत्रांवरच नव्हे, तर 'महाज्योती'ला निधी, ओबीसी वसतिगृहे, विद्यार्थ्यांना उद्योगासाठी सवलती आणि कमी व्याजदराचे कर्ज यांसारख्या ओबीसी समाजाच्या इतर मागण्यांवरही सकारात्मक चर्चा झाली. याविषयीच्या श्वेतपत्रिकेबाबत संपूर्ण माहिती आल्यावरच यावर बोलता येईल असे बावनकुळे यांनी सांगितले.राज्यात अनेक ठिकाणी पूरपरिस्थिती गंभीर आहे. या पार्श्वभूमीवर ओबीसी संघटनांनी 10 ऑक्टोबर रोजी नियोजित केलेला मोर्चा परत घ्यावा, अशी विनंती आम्ही सर्वांनी शिष्टमंडळाला केली आहे. "ओबीसी शिष्टमंडळ आमची विनंती मान्य करेल, असा आम्हाला विश्वास आहे," असे बावनकुळे म्हणाले.मनोज जरांगे पाटील यांच्या भूमिकेवर बोलताना ते म्हणाले की, लोकशाहीत सर्वांना न्यायालयात जाण्याचा अधिकार आहे, पण आरक्षणाचे निर्णय कायद्याच्या चौकटीतच होतील. "सरकारची भूमिका मराठा आणि ओबीसी दोन्ही समाजांना न्याय देण्याची आहे. कुणाच्या ताटातलं दुसऱ्याच्या ताटात जाणार नाही, हे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे आणि कुठल्याही समाजावर अन्याय होणार नाही याची शासन पूर्ण काळजी घेईल," असेही त्यांनी नमूद केले.

---

आ. अर्जुन खोतकर, आ. बबनराव लोणीकर, आ. नारायण कुचे, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, महापालिका आयुक्त संतोष खांडेकर यांच्या उपस्थितीत पार पडला.राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी दृकश्राव्य प्रणालीद्वारे सहभागी होत नियुक्ती आदेशाचे वाटप करण्यात आलेल्या उमेदवारांचे मन:पुर्वक अभिनंदन करुन भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्ह्यात सर्वत्र रेड अलर्ट जाहीर झाल्यानंतर जिल्हा प्रशासनाने तातडीने हालचाली करत अधिकाधिक नागरिकांना, पशुधनाला सुरक्षित स्थळी हलवले. रेड अलर्टमध्ये जिल्हा प्रशासनाने समन्वय ठेवून खुप छान काम केले. जिल्हा प्रशासनाचा प्रत्येक कामात नेहमी पुढाकार असतो. आपले काम कौतुकास्पद आहे, अशा शब्दांत कौतुक केले.शासकीय सेवेत कार्यरत असतांना अधिकारी व कर्मचाऱ्याचे निधन झाल्यास त्याच्या कुटुंबावर ओढवणाऱ्या आर्थिक आपत्तीतून कुटुंबियांना सावरण्यासाठी कुटुंबातील एका सदस्यास अनुकंपा तत्वावर शासकीय सेवेत नियुक्ती देण्याचे सुधारित धोरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राज्य शासनाने पारित केले होते. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयात मागील महिन्यात झालेल्या मेळाव्यात उमदेवारांना शासन निर्णय व नियुक्ती प्रकियेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यात अनुकंपा तत्वावर गट-'क' आणि गट-'ड' पदासाठी प्रतिक्षा यादीतील 79 उमेदवारांची, तर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडूनही 49 उमेदवारांची नियुक्तीकरिता शिफारस करण्यात आली आहे. अशी एकुण 128 उमेदवारांना नियुक्तीपत्रे यावेळी देण्यात आली.

---

प्रत्येक क्षणाला जी घटना घडली ती पाहिली आहे. रामदास कदम यांना बाळासाहेब ठाकरे गेल्यानंतर जवळपास 15 वर्षांनी कंठ फुटला आहे. 2014 ला रामदास कदम मंत्री झाले. त्यांना मंत्री उद्धव ठाकरेंनी केलं. उद्धव ठाकरे इतके वाईट होते तर मग त्यांनी मंत्रिपद का स्वीकारलं? 2019 ला मुलाला आमदारकी घेतली. उद्धव ठाकरेंकडून सगळं मिळत होतं तोपर्यंत उद्धव ठाकरे चांगले होते. जर ते स्वतःला स्वाभिमानी समजतात तर रामदास कदम यांनी तेव्हाच पक्ष सोडायला हवा होता. 2012 मध्ये रामदास कदम कुठल्या बाकड्यावर झोपले होते तो बाकडा मी शोधतो आहे. बाळासाहेब ठाकरे ज्या खोलीत होते, त्यावेळी 24 तास तिथे डॉक्टरांचं पथक होतं. प्रत्येक मिनिटाला मॉनिटरिंग सुरु होतं. असंख्य लोक भेटायला येत होते. सगळ्यांना माहीत होतं की बाळासाहेब ठाकरे जिवंत आहेत. बाळासाहेब ठाकरेंच्या नावाचं राजकारण करायचं आणि महाराष्ट्रातल्या प्रश्नांपासून बाजूला न्यायचं असले प्रकार चालले आहेत.1993 मध्ये रामदास कदम यांच्या बायकोने स्वतःला जाळून घेतलं. ते जाळून घेतलं की जाळलं? हे देखील नार्को टेस्टमध्ये आलं पाहिजे. कुणाला बंगले बांधून दिले, त्याचे तपशीलही आले पाहिजेत. योगेश कदम हा आता गृहराज्यमंत्री आहे. आपल्या बापाने काय उद्योग केले आहेत त्याची चौकशी झाली पाहिजे. आपलं ठेवायचं झाकून आणि दुसऱ्याचं बघायचं वाकून या पद्धतीला आळा घालण्याची गरज आहे. बाळासाहेब ठाकरेंचं मृत्यूपत्र काय आहे ते मला माहीत आहे. त्यातला तपशील मला ठाऊक आहे. ते करुन घेण्याची जबाबदारी माझ्यावर होती. शिवाय त्यावर कुणाच्या सह्या आहेत, कुणाचे ठसे आहेत हे मला माहीत आहे. मेलेल्या माणसाच्या हाताचे ठसे घेतले तरीही काही उपयोग होत नाही. हे मी तुम्हाला सांगतो आहे. रामदास कदम यांचं ज्ञान कच्चं आहे. उद्धव ठाकरेंबाबत जनतेच्या मनात विष कालवायचं म्हणून हे आरोप करण्यात आले आहेत असंही अनिल परब म्हणाले.

---

त्यानुसार चालकासह अन्य व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. या ट्रकमध्ये अंदाजित 37 लाखांची हळद होती.प्रितेश दुर्गाप्रसाद सोनी (रा.छत्रपती संभाजीनगर) यांनी 30 सप्टेंबर रोजी अंबाजोगाई तालुक्यातील लोखंडी सावरगाव येथून ट्रक क्रं. एम.एच26 एडी 2935 यामध्ये 28 टन हळद भरुन ती सोलापुरला पाठविली होती. हळदीचा ट्रक सोलापुरला गेलाच नाही. चालकाने इतर ठिकाणी हळद लंपास केल्याचे प्रितेश सोनी यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी या प्रकरणी अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार चालक नदीम खान मुजाहेद खान (रा. अपना कॉर्नर, परभणी), सय्यद अजगर सय्यद सज्जान(रा. दंडी, परभणी) व इतर जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील चालकास पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या ट्रकमध्ये जवळपास 30 किलो वजनाच्या 600 पोत्यामध्ये 39 लाख 76 हजार 700 रुपयांची हळद होती. चालकाने हळद नेमकी कोठे विकली, कोणाला दिली या प्रकरणाची अधिक चौकशी अंबाजोगाई पोलीस करत आहेत.

---

रॅली सुरुवात होऊन त्यानंतर सामूहिक भोजनदान होणार आहे या रॅलीत उंट घोडे पारंपारिक वाद्य अशी भव्य ऐतिहासिक धम्म रॅली निघणार असून या धम्म रॅलीत परळी परिसर व शहरातील सर्व श्रद्धावान बुद्ध उपासक-उपासिकांनी पांढरे वस्त्र परिधान करून या रॅलीत सहभागी व्हावे असे आवाहन संयोजन समिती यांनी केले आहे.

## पान 4 वरुन

याठिकाणी ज्योती, अश्विनी, दिपाली, व मोहीनी या चार सख्या बहिणी पोलिस दलात कार्यरत आहेत. पाचवी बहीण देखील पोलिस भरतीची तयारी करत असून त्या एकूण सहा बहिणी व एक भाऊ आहे. दहा एक्कर जमीन होती, त्यातून दोन एक्कर जमीन विक्री करुन शिक्षण पुर्ण केले. घर पावसामुळे गळत असले तरी त्यात सहनशिलता, त्याग आणि संघर्ष खुप मोठा आहे. कापुस वेचून, खुरपणी करुन यातील या चारही बहीणींनी खुप कष्ट करुन हे यश मिळवलं. गावकऱ्यांनी या यशाचं जोरदार स्वागत केलं. नंदपूरसह संपूर्ण गेवराई तालुक्यात या घटनेची चर्चा असून "शेतकऱ्यांच्या लेकरांनी काय करता येतं" याचं हे उत्तम उदाहरण असल्याचं सांगितलं जातं. समाजासाठी प्रेरणादायी आदर्श सांगायचा झाल्यास चार सख्या बहिणींच्या या यशामागे जिद्द, चिकाटी आणि पालकांचा संघर्ष दडलेला आहे. मुलींनी केवळ कुटुंबाचंच नव्हे तर ग्रामीण भागातील अनेक कुटुंबातील मुलींना स्वप्न बाळगण्याची हिंमत दिली आहे. शेतकऱ्याच्या घामातून उमललेली ही स्वप्नं पोलिस दलाच्या गणवेशात आता समाजाची सेवा करतील. सलाम या संघर्षातून उभ्या राहिलेल्या शेतकऱ्याच्या कन्यांना...

---

क्षीरसागर यांनी काकूंच्या कार्याला उजाळा देतांना म्हंटले. इ.स.1995-96 साली काकू खासदार असतांना रेल्वे बजेट दरम्यान खऱ्या अर्थाने अहिल्यानगर- बीड- परळी रेल्वेसाठी निधी पडला. काकूंनी अत्यंत प्रतिकृतपरिस्थितीत आम्हा सर्वांना तर वाढवलेच परंतू जगाचा रहाट गाडा ही चालवला. त्यांचे संस्कार, त्यांचे कार्य पुढे नेण्याचे काम आम्ही करण्याचा प्रयत्न करत आहोत. सत्ता असो या नसो लोकांची कामे करणे, लोकसेवा करणे ही काकूंची शिकवण आहे. तो वारसा आम्ही पुढे नेत असल्याचे अण्णांनी म्हंटले. वेळे अभावी त्यांचे भाषण पुर्ण देता आले नाही. यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्यासह क्षीरसागर कुटूंब त्याच बरोबर क्षीरसागर कुटूंबियांवर प्रेम करणारे उपस्थित होते.

---

अध्यक्षपदी महाविद्यालयाच्या प्राचार्य पठाण मुनवारी हसन खान मॅडम. या होत्या समुपदेशक श्री शरद चव्हाण यांनी महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार हा कार्यक्रम महाविद्यालयासाठी खास करून का आयोजित केले जातात याबाबतीत माहिती दिली यावेळी विद्यार्थ्यांचे मानसिक,शारीरिक आरोग्य तसेच एचआयव्ही/ एड्स बद्दल मूलभूत माहिती कारणे लक्षणे प्रतिबंधात्मक उपाय कलंक व भेदभाव , 1097 टोल फ्री क्रमांक, 2017 चा कायदा इत्यादी बाबत विस्तृत माहिती दिली एड्स संदर्भात असणारे गैरसमज दूर करून त्याबद्दल शास्त्रीय माहिती घेण्याचे आव्हान त्यांनी केले तसेच आयसीटीसी सेंटरची कार्यप्रणाली याबद्दल माहिती देण्यात आली, एच आय व्ही/ एड्स संदर्भातील माहिती पुस्तकांचे वाटप करण्यात आले या कार्यक्रमाला प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी विद्यार्थिनी मिळून 110 जन उपस्थितहोते.

---

वाढले आहे. या प्रसूतींसाठी आमचा नवजात शिशू अतिदक्षता विभाग पूर्णपणे सज्ज आहे. जुळ्या बालकांच्या प्रसूतीदरम्यान आणि नंतर आई आणि बाळांची काळजी घेण्यासाठी आम्ही विशेष वैद्यकीय पथकामार्फत सेवा देतो.- डॉ.एल.आर.तांदळे, निवासी वैद्यकीय अधिकारी बीड

---

खास आयोजित या स्पर्धेत विविध विषयांवर लेखन करण्याची संधी मुलांना मिळाली. मराठी भाषेवरील प्रेम, सामाजिक जाणिवा, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, विज्ञानाची किमया, शिक्षकांचे योगदान अशा विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी आपले विचार अत्यंत प्रभावी व आकर्षक पद्धतीने मांडले. लहानग्या लेखकांच्या कल्पनाशक्तीला मिळालेल्या पंखांमुळे अनेक मौलिक व हटके विचार निबंधातून व्यक्त झाले. परीक्षकांना विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचा व तल्लखतेचा प्रत्यय येत होता. ही स्पर्धा विद्यार्थ्यांमध्ये लेखनकौशल्य, विचारशक्ती व सामाजिक भान वृद्धिंगत करणारी ठरली. यानंतर वातावरणात अजूनही उत्साहाचे रंग भरले ते संगीत खुर्चीच्या खेळामुळे. हा उपक्रम इयत्ता पहिली ते तिसरीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला होता. गोड गाणी, जोशात वाजणारे सूर, त्या तालावर लहानग्यांची धावपळ आणि स्पर्धेत जिंकण्यासाठीचे त्यांचे प्रयत्न पाहून प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. चेहऱ्यावरचे निरागस हसू, पडलेली खट्याळ धावपळ, मित्राला हरवायचे समाधान व हरल्यावरही दिसलेली हसरी मुद्रा – यामुळे संपूर्ण शालेय परिसर टाळ्यांच्या गजराने आणि हास्यकल्लोळाने दुमदुमून गेला. या उपक्रमांत इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. प्रत्येक विद्यार्थ्याच्या चेहऱ्यावर समाधान आणि आत्मविश्वास झळकत होता. उपस्थित पालक, शिक्षकवर्ग आणि मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या उमेदीला दाद दिली.

ज्ञानकुंभ सप्ताहाचे आयोजन हे केवळ स्पर्धांचे नव्हे तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे एक व्यासपीठ ठरावे, हा हेतू ठेवून सर्व कार्यक्रमांची आखणी करण्यात आली आहे. दुसऱ्या दिवसाचे उपक्रम मुलांच्या भाषिक कौशल्यांना चालना देणारे आणि मानसिक ताजेतवानेपणा वाढवणारे ठरले. संपूर्ण शिक्षकवर्गाने या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. फाजगे सर यांनी तर आभारप्रदर्शन सौ. चाटे मॅडम यांनी केले. ज्ञानकुंभ सप्ताहाचे पुढील दिवस अजूनही अधिक प्रेरणादायी आणि उत्साही ठरणार असून विविध ज्ञानवर्धक व मनोरंजनात्मक उपक्रमांची विद्यार्थी व पालक दोघेही आतुरतेने वाट पाहत आहेत. या आठवड्यातील प्रत्येक क्षण हा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाच्या प्रवासात एक अमूल्य ठेवा ठरणार आहे, याबाबत कोणतीही शंका नाही.

---

महामानव विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास प्रथम अभिवादन करण्यात आले.यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे, सामाजिक कार्यकर्ते दत्ताभाऊ सावंत, ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक रानबा गायकवाड, वीज निर्मिती केंद्राचे वरिष्ठ अधिकारी विलास ताटे, पत्रकार भगवान साकसमुद्रे, भगवान कसबे, प्रसिद्ध कवी व निवेदक बा.सो . कांबळे,पिंटू सरवदे, वडगाव स्टेशन चे स्टेशन मास्तर मिलिंद सावंत आदी उपस्थित होते.

---

बालकविता - माझी छकुली तसेच मराठवाड्यात यावर्षी अतिवर्षावामुळे आलेल्या पुरामुळे झालेली शेतकऱ्याची दुरवस्था वर्णन करणारी गझल हृदयाचा ठाव घेऊन गेली . शेतात राबताना गेली हयात ही मातीत खोल रुजल्या गेल्यात वेदना । तसेच छत्रपती शिवाजी महाराज गीत . ही पोवाडा सदृश कविता सादर केली .असतील झाले राजे या भूमीवर थोर -नाही कुणाला आली माझ्या राजाची सर - " *श्वास ध्यास हृदयात आमुच्याराजे छत्रपति आमचे राजे छत्रपति * अशा त्यांच्या अनेक कवितांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले . या कार्यक्रमासाठी मराठी प्रमुख प्रा .डॉ .यल्लावाड आर . के . प्रा . डॉ . नेरकर श्याम यांची उपस्थिती होती . या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन डॉ श्री अरुण चव्हाण यांनी केले . याप्रसंगी महाविद्यालयातील अनेक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी वृंद मोठ्याप्रमाणात उपस्थित होता .

---

यांनी केले. तसेच महात्मा गांधी यांच्या विचाराची सुद्धा सध्याच्या काळातील सर्व समाज बांधवांना नितांत गरज आहे.महात्मा गांधींनी निर्माण केलेली स्वदेशी चळवळ, महात्मा गांधीजीचा समतेचा संदेश,समानतेची भावना,आजच्या काळामध्ये सर्व समाज बांधवांनी अंगीकारणे गरजेचे आहे असेही मत खळगे सरांनी व्यक्त केले.लालबहादूर शास्त्री यांनी अतिशय चांगल्या पद्धतीने भारताची जडणघडण करण्यासाठी नवीन दिशा देण्याचे काम केलेलआहे.देशाचा पंतप्रधान कसा असावा,त्याचे राहणीमान कस असावा,त्याचे विचार कसे असावेत. काटकसरीपणा कसा असावा.साधी राहणी आणि उच्च विचार कसे असावे.हे प्रभावी गुण लालबहादूर शास्त्री यांच्याकडून घेण्यासारखे आहेत.असेही विचार खळगे सरांनी मांडले. तथागत सिद्धार्थ गौतम बुद्धाच्या शिकवणुकीप्रमाणे प्रत्येक मानवानं जर आपलं आचरण केलं,बुद्धाच्या मार्गाने जर माणसाने जाण्याचा प्रयत्न केला.तर घराघरांमध्ये होणारे कलह, कुटुंबामध्ये होणारे वाद,देशात होणारी युद्ध,भांडणे तंटे,नक्कीच संपुष्टात येतील.देश, समाज,मानव,अतिशय चांगल्या पद्धतीने जीवन जगेल,यासाठी तथागत सिद्धार्थ गौतम बुद्धाचे समता, स्वातंत्र्य,बंधुत्व,शील, करुणा हे विचार आत्मसात करणे गरजेचे आहे.असेही प्रतिपादन खळगे सर यांनी केले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने अनेक विद्यार्थी वाचक वर्ग फार मोठ्या प्रमाणामध्ये उपस्थित होत्या.त्यामध्ये सुखदेव वाव्हळ, ग्रामपंचायत सदस्य केशरबाई खळगे,सहाय्यक ग्रंथपाल सौ. शीला सुखदेव उजगरे,अंगणवाडी ताई श्रीमती अग्री अण्णाभाऊ खळगे,छायाबाई साळवे, जाणकाबाई डोंगरे,लक्ष्मी ताई वाव्हळ विद्याताई खळगे,अलकाताई उजगरे,क्रांती खळगे,सलोनी खळगे,सतू बाई आडागळे,सविता खळगे,गिरजाबाई खळगे, राजनंदनी खळगे,अनन्या खळगे,वैष्णवी गिरी,सानिया गायकवाड,निकिता खळगे, सोनाली साळवे,राजन,साजन इ सह अनेक मान्यवर उपस्थित होते. सर्वांना अल्पउपहार देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

---

बांधकाम रवी तोंडे, जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख कृष्णा शिंदे, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी प्रविण उखळीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. शासकीय सेवेत असतांना कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्यास त्याच्या पत्नी अथवा अपत्याला नोकरी दिली जाते. परंतू, तांत्रिक कारणे किंवा काही प्रशासकीय कारणास्तव या नियुक्त्या रखडलेल्या होत्या. त्यामुळे त्यांना दीर्घ प्रतिक्षा करावी लागत होती. अशा या संवेदनशील विषयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्ष घालून नवीन अनुकंपा धोरण तयार केले. त्याचाच परिणाम म्हणून आज अनुकंपा प्रतिक्षा यादीतील अनुकंपा उमेदवारांना एकाच वेळी नियुक्ती पत्रे देण्यात आली.

तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 150 दिवसांच्या प्रशासकीय सुधारणांच्या हाती घेतलेल्या कार्यक्रमातंर्गत महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत परीक्षा घेण्यात आलेल्या लिपिक-टंकलेखक श्रेणीतील उमेदवारांना देखील नियुक्तीपत्रे देण्यात आली. आज आयोजित या मेळाव्यात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत आणि अपर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक यांच्या हस्ते महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सरळसेवेतून निवड झालेले लिपिक-टंकलेखक संवर्गातील 64 उमेदवार तसेच अनुकंपा तत्वावरील गट-क संवर्गातील 36 आणि गट-ड संवर्गातील 08 उमेदवार अशा एकूण 108 उमेदवारांना नियुक्ती आदेशांचे वितरण करण्यात आले. जिल्हास्तरीय रोजगार मेळाव्यास संबंधित उमेदवार व विविध विभागातील अधिकारी-कर्मचारी यांची उपस्थिती होती.

---

सुरु आहे. त्या आंदोलनात सर्वानीं सहभागी व्हावे असे आवाहन केले. उपस्थित महिलांनी सामुदायिक वंदना घेतली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते विश्वनाथ गायकवाड, महिला मंडळाच्या अध्यक्षा महानंदा व्हावळे, सचिव रजनी आगळे, रायभोळे ताई, रोडे ताई, वैशाली ताटे, सुमनबाई व्हावळे, लांडगे ताई यांच्या सह बहुसंख्येने महिला उपस्थित होत्या.

---

डॉ. रमेश राठोड यांच्या उपस्थितित आपत्ती व्यवस्थापन कक्ष समिती एन. एस. एस स्वयंसेवक प्रणव आघाव , सचिव - अशिष मुंडे , तर सदस्य म्हणून किरण गुट्टे , विकास राठोड, आकाश बनसोडे , करण गीत्ते , सचिन गोल्हेर , भागवत मंत्री यांची निवड करण्यात आली. हि समिती पुरग्रस्त भागातील विद्यार्थीच्या शौक्षणिक समस्या व आपत्ती मुळे झाल्या नुकसान त्याची अहवाल महाराष्ट्र शासनाच्या शौक्षणिक विभागास पाठऊन मदतनीस म्हणून कार्य करणार आहे. यासमितीचे समन्वयक म्हणून प्रा. माधव रोडे , उपप्राचार्य प्रा. डि. के. अंधाळे , उपप्राचार्य डॉ. व्हि. बी. गायकवाड हे करणार असून त्यांच्यात विशेष एन. एस. एस. कार्यक्रमधिकारी प्रा. भिमानंद गजभारे हे कामकाज पाहणार आहेत . याउपक्रमास रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बी . व्ही . केंद्रे , प्रा. डॉ. रमेश राठोड , प्रा. डॉ. सोमनाथ किरवले , प्रा. शंकर धांडे , प्रा. उमाकांत कुरे , प्रा. मनोहर चाटे , प्रा. मारुती मोकळे अदि उपस्थितित होते.

---

प्रमाणे केंद्र वडवणी अंतर्गत सर्व शाळांचे मुख्याध्यापक तथा सर्व शिक्षक बंधू-भगिनीं यांची या परिषदेला उपस्थिती लाभली. परिषदेची सुरुवात राष्ट्रगीताने करण्यात आली.या परिषदेसाठी केंद्रप्रमुख श्री करांडे साहेब अध्यक्ष भुषविले.त्यानंतर व्यासपीठावर उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.इयत्ता वी च्या विद्यार्थीनींनी स्वागतम...सुस्वागतम.. .हे गीत गायण करून मान्यवरांचे तसेच सर्व शिक्षक बंधू-भगिनींचे शब्द-काव्य पुष्पांनी स्वागत केले.तदनंतर वडवणी केंद्रातून बदली होऊन इतर ठिकाणी गेलेल्या शिक्षक बंधू-भगिनींना मान्यवरांच्या हस्ते शाल आणि झाड देऊन निरोप देण्यात आला. त्याचप्रमाणे इतर केंद्रातून वडवणी केंद्रातील शाळांमध्ये नवीन रुजू झालेल्या सर्व शिक्षक बंधू-भगिनींचे मान्यवरांच्या हस्ते सन्हदय शाल, पुष्पगुच्छ आणि झाड देऊन स्वागत करण्यात आले.त्या नंतर केंद्रप्रमुख श्री करांडे साहेब यांनी शिक्षण परिषदेचे प्रास्ताविक केले.कार्यक्रमाची रुपरेषा आणि काही शासकीय महत्वाच्या विषयाला ओघवता स्पर्श केला.तदनंतर श्री डोरले सर यांनी आपली तासिका खान अकॅडमी पोर्टल नोंदनी व माहिती दिली. त्याचप्रमाणे श्री राठोड सर यांनी जयंत नारळीकर विज्ञान व गणित समृद्धी कार्यक्रम या संदर्भात इत्यंभूत माहिती आपल्या तासिकेच्या माध्यमातून दिली.अतिशय चवदार असा व्हेज पुलाव आणि स्वादिष्ट जिलेबीच्या सर्व उपस्थितांनी अस्वाद घेतला.क्षुदा तृप्ती नंतर श्री राठोड सर यांनी प्रोजेक्टर च्या माध्यमातून काही महत्वाच्या संकल्पना समजाऊन सांगितल्या.या सर्व कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचालन श्री खाटवकर सर यांनी केले. तर कार्यक्रमाचे आभार श्री शिंदे सर यांनी माणले.या शिक्षण परिषदेचे आयोजन आणि सौजन्य प्रा.शा साळिंबा, प्रा.शा.मामला आणि प्रा. शा.सौंदडवस्ती यांनी पार पाडले.या परिषदेच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री राठोड सर,यंदे सर,शिंदे सर,श्रीम.देखणे मॅडम,अर्जुन शिंदे सर,सोळुके सर,चिंबडे सर,श्रीम.सांगळे मॅडम आदी सर्वांनी परिश्रम घेतले.शेवटी वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताने या शिक्षण परिषदेची सांगता करण्यात.शिक्षण परिषदेमध्ये निरोप आणि स्वागत समारंभ हा भावस्पर्शी ठरला,एकंदरीत या कार्यक्रमामध्ये सहभागी झालेल्या प्रत्येकाच्या चेहऱ्यावर हास्य आणि समाधान दिसत होते, अशा उत्साही वातावरणात वडवणी बॉईज केंद्राची शिक्षण परिषद उत्साहात संपन्न झाली.

---

मचाले यांनी आपल्या मनोगतात स्व. केशरकाकू क्षीरसागर यांचे सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक कार्याचे स्मरण करून विद्यार्थ्यांना प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. यावेळी प्राध्यापकांनीही त्यांच्या कार्याचा गौरव करत आठवणींना उजाळा दिला.

या अभिवादन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. भागवत फुलारी यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा सुभाष लांडगे यांनी मानले. उपस्थितांनी शांततेत दोन मिनिटे मौन बाळगून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

---

# शेतकऱ्याच्या संघर्षाचं झालं सोनं!

## ➲ गेवराई तालुक्यातील चार सख्या बहिणी झाल्या पोलिस




गेवराई: शेतकऱ्याच्या घामाने पिकवलेलं धान्य आणि त्याच घामातून उभं राहिलेलं स्वप्न आज प्रत्यक्षात उतरलं आहे. गेवराई तालुक्यातील नंदपूर गावातील शेतकरी कुटुंबातील चार सख्या बहिणींनी पोलिस दलात प्रवेश मिळवत इतिहास रचला आहे. चंद्रसेन उबाळे यांच्या या संघर्ष कन्येनी रात्रंदिवस अभ्यास करुन मिळवलेलं हे ऐतिहासिक यश आदर्शवत आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह शेतावर अवलंबून

उन्हातान्हात राबून मुलींच्या शिक्षणासाठी वडिलांनी झगडणं सुरु ठेवलं. आर्थिक संकटं, शेतातल्या अडचणी, पावसाचा लपंडाव... अशा अनेक समस्यांवर मात करत त्यांनी मुलींना शिक्षण दिलं. घरची परिस्थिती कितीही कठीण असली तरी "मुलींना उभं करायचंच" हा निर्धार वडिलांनी सोडला नाही. या अथक परिश्रमाचं चीज आज मुलींनी सोन्याहून पिवळं उत्तर देत केलं आहे. चारही बहिणींनी पोलिस भरतीत यश मिळवून गावाचं नाव उज्ज्वल केलं आहे. वडिलांच्या डोळ्यांतले आनंदाश्रू हेच या यशाचं खरं गमक ठरत आहेत.

आज त्या बीड जिल्ह्यातील माजलगाव, बीड तसेच पिंपरी चिंचवड आणि छत्रपती संभाजीनगर

# काकूंचा वारसा चालवण्याचा प्रयत्न करत आहोत-जयदत्त क्षीरसागर

## » पुण्यतिथीनिमित्त अनेकांकडून काकूंना अभिवादन



बीड,):- माजी खा.स्व. केशरकाकू क्षीरसागर यांच्या 19 व्या पुण्यतिथीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून आज सकाळपासून काकूंच्या समाधीस्थळी अनेकांनी अभिवादन केले. या निमित्ताने आयोजित किर्तनाच्या कार्यक्रमाला जिल्हाभरातून अनेकांची उपस्थिती प्रखर्शाने दिसून आले. माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी यावेळी काकूंच्या जिवन कार्याला उजाळा देत काकू अहिल्यानगर -बीड – परळी रेल्वे मार्गाच्या शिल्पकार असल्याचे म्हंटले.

बीड जिल्याच्या माजी खा.स्व.केशरकाकू क्षीरसागर यांची आज 19 वी पुण्यतिथी त्यानिमित्ताने आज त्यांच्या समाधी स्थळी अनेकांनी अभिवादन केले. त्या निमित्ताने केएसके कॉलेज परिसरात रामायणाचार्य ह.भ.प ढोक महाराज यांचे किर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी मंत्री जयदत्त

## डॉ.झाकीर हुसेन उर्दु उच्चमध्यमिक महाविद्यालयात एच आय व्ही/एड्स जनजागृती शिबिर संपन्न



परळी प्रतिनिधी : इंटेन्सिफाइड आय इ सी कॅम्पेन अंतर्गत वैद्यकीय अधीक्षक उपजिल्हा रुग्णालय व जिल्हा एड्स प्रतिबंधक व नियंत्रण कक्ष जिल्हा रुग्णालय बीड यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार आयसीटीसी विभाग उपजिल्हा रुग्णालय परळी वै. यांच्या वतीने डॉ. झाकीर हुसेन उर्दु उच्चमध्यमिक महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे एचआयव्ही/एड्स जनजागृती शिबिर सकाळी 10 वाजता आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन महाविद्यालयाचे प्राध्यापक सय्यद सबाहत आली सर यांनी केले या कार्यक्रमाच्या

## एक नव्हे दोन पेढे; बीड जिल्हा रुग्णालयात नऊमहिन्यांत जन्मले 42 जुळे !



बीड : पूर्वी क्वचितच दिसणाऱ्या जुळ्या आणि तिळ्या मुलांचे जन्म आता वाढले आहेत. गेल्या नऊ महिन्यांत जिल्हा रुग्णालयात जन्मलेल्या या बालकांच्या संख्येवरुन याची कल्पना येते. कृत्रिम गर्भधारणा तंत्रज्ञान आणि अनुवांशिकता या प्रमुख वैद्यकीय कारणांमुळे हे प्रमाण वाढत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. ही वाढती आकडेवारी जिल्ह्यासाठी आनंदाची बातमी आहे जिल्ह्यात नऊ महिन्यांत 42 जुळ्यांचा जन्म झाला आहे. यातील काहीचे सिझेरियन झाले आहे. तर काही प्रसूती सामान्य पद्धतीने झाल्या आहेत. गेल्या काही वर्षांत जुळे आणि तिळे जन्मण्याचे प्रमाण

# निबंध स्पर्धा व संगीत खुर्चीमुळे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला आणि आनंदाला मिळाली नवी उभारी

## » शिक्षणमहर्षी कै. विठ्ठलरावजी तांदळे सरांच्या जयंतीनिमित्त सुरू असलेल्या ज्ञानकुंभ सप्ताहाचा दुसरा दिवस उत्साहात साजरा





परळी (प्रतिनिधी) – श्री पद्मावती शिक्षण संस्था संचलित संस्कार प्राथमिक शाळा, पद्मावती व विद्यानगर विभाग येथे सुरु असलेल्या ज्ञानकुंभ सप्ताहाचा दुसरा दिवसही विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी, उत्साहवर्धक व आनंददायी ठरला. शिक्षणमहर्षी कै. विठ्ठलरावजी तांदळे सरांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी आयोजित केलेल्या या सप्ताहातील कार्यक्रमांना शालेय परिसरात मोठ्या जोशात प्रतिसाद मिळत असून, प्रत्येक दिवशी विद्यार्थ्यांचा सहभाग आणि आनंद पाहून वातावरण भारावून जाते.

आजच्या दिवसाची सुरुवात निबंध स्पर्धेने झाली. इयत्ता चौथी ते सातवीतील विद्यार्थ्यांसाठी

## मराठवाडा विभागीय शिक्षक साहित्य संमेलनाचे अध्यक्ष गंडले यांचा सत्कार संपन्न



परळी प्रतिनिधी. नोव्हेंबर मध्ये परळी वैजनाथ येथे होणाऱ्या 7 व्या मराठवाडा विभागीय शिक्षक साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रसिद्ध विचारवंत व साहित्यिक अजयकुमार गंडले यांचा मित्र मंडळीच्या वतीने नुकताच सत्कार करण्यात आला.

16 नोव्हेंबर 2025 रोजी परळी येथे साप्ताहिक शिक्षण मार्गाच्या वतीने सातवे मराठवाडा विभागीय शिक्षक साहित्य संमेलन आयोजित करण्यात आलेले आहे .या संमेलनाच्या अध्यक्षपदी साहित्यिक व विचारवंत अजयकुमार गंडले यांची निवड करण्यात आलेले आहे. त्यांच्या या निवडीबद्दल 2 ऑक्टोंबर रोजी धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या निमित्ताने मित्रमंडळीच्या वतीने त्यांचा सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.

शहरातील रेल्वे स्टेशन परिसरातील

## वाचन हे जीवनाला समृद्ध करते;प्रसिद्ध कवी श्री सिद्धेश्वर इंगोले यांचे प्रतिपादन




परळी ( प्रतिनिधी ) येथील कै लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात मराठी अभिजात भाषा सन्मान सप्ताहा निमित्त कविता आणि माझी कविता या विषयावर प्रसिद्ध कवी सिद्धेश्वर इंगोले यांचे प्रबोधन आयोजित करण्यात आले .

विद्यार्थिनींना मराठी कवितेची आवड निर्माण व्हावी त्यांच्यामधून भविष्यत् अनेक कवयित्री निर्माण व्हाव्यात हा उद्देश घेऊन हे आयोजन केले होते .

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ विद्याताई देशपांडे यांच्या समर्थ मार्गदर्शनात झालेल्या या कार्यक्रमात अध्यक्षा म्हणून हिंदी विभागाच्या डॉ राजश्री कल्याणकर यांची उपस्थिती लाभली .

स्वागत समारंभानंतर आपल्या व्याख्यानात श्री इंगोले यांनी कवितेच्या समग्र स्वरूपाचा आढावा घेतला . मराठी साहित्यात कवितेचे महत्त्व सांगून हे साहित्य वाचल्याने जीवन समृद्ध होते असे प्रतिपादन केले .

त्यांनी सादर केलेली

## महापुरुषांच्या विचारांची प्रेरणा समाजातील लोकांनी घ्यावी - प्रा प्रकाश खळगे




मौजे पिंपरखेड तालुका वडवणी जिल्हा बीड या ठिकाणी छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालय मौजे पिंपरखेड तालुका वडवणी जिल्हा बीड या संस्कार केंद्रामध्ये धम्मचक्र प्रवर्तन दिन व महात्मा गांधी यांची जयंती व लालबहादूर शास्त्री यांची जयंती फार मोठ्या उत्साह पूर्ण वातावरणामध्ये साजरी करण्यात आली.या कार्यक्रमाच्या निमित्ताने सर्व महापुरुष यांच्या प्रतिमाचे पूजन कारण्यात आले आणि खळगे सर यांनी आपले विचार मांडले ते म्हणाले कि,डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी महान अशा पद्धतीची धम्मक्रांती करून 14 ऑक्टोबर 1956 संबंध मानव जातीला एक नवा संदेश एक नवा विचार एक नवी प्रेरणा देण्याचे महान कार्य केलेल आहे.त्यांनी केलेल्या कार्यांचा व धम्म संदेशाचा सर्व समाजातील लोकांनी जास्तीत जास्त आपल्या जीवनामध्ये उपयोग करून घ्यावा असे प्रतिपादन खळगे सर

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा आज परळीत विजयादशमी उत्सव

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, तालुका परळी वैजनाथ यांच्या वतीने आज रविवार, दि. 5 ऑक्टोबर रोजी दुपारी 4 वाजता विजयादशमी उत्सव व पथसंचलनाचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी संघाला 100 वर्ष पूर्ण होत असल्याने हा उत्सव विशेष उत्साहात साजरा केला जात आहे.

कार्यक्रमाचे ठिकाण चिंतामणी फाउंडेशन स्कूल, तोतला मैदान, परळी वैजनाथ असे असून पथसंचलनाचा मार्ग चिंतामणी फाउंडेशन स्कूल — डॉ. हडबे हॉस्पिटल — सोनार लाईन — राणी लक्ष्मीबाई टॉवर — गणेशपार — नांदूरवेस — सरकारवाडा — आंबेवेस — तळ नगरेश्वर चौक मार्गे पुन्हा चिंतामणी फाउंडेशन स्कूल येथे समारोप होणार आहे.

सर्व हिंदू बांधवांनी सहकुटुंब उपस्थित राहावे, असे आवाहन संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

## अनुकंपा तत्वावरील व लिपिक श्रेणीतील जिल्ह्यातील 108 उमेदवारांना नियुक्ती पत्र वितरण




बीड,दि.4(जिमाका) : मुख्यमंत्री यांच्या 150 दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत अनुकंपा तत्वावरील गट-क संवर्गातील उमेदवार आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सरळसेवेतून निवड झालेले लिपिक-टंकलेखक संवर्गातील उमेदवारांना आज नियुक्ती पत्र वितरीत करण्यात आली.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन सभागृहात आज आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय रोजगार मेळाव्यात उमेदवारांना नियुक्ती पत्र वितरीत करण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत, अपर जिल्हाधिकारी हरीष धार्मिक, तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी एम.एस.साळवे, जिल्हा कोषागार अधिकारी लहू गळगुंडे, कार्यकारी अभियंता सार्वजनिक

## भिमवाडी त्रिरत्न बुद्ध विहारात 69 वा धम्मचक्र प्रवर्तनदिन मोठ्या उत्साहात साजरा



परळी ( प्रतिनिधी ) बुद्ध धम्माची चळवळ गतिमान करण्यासाठी धम्माचे आचरण करणारे बौद्ध उपासक व उपासिका निर्माण करण्यासाठी प्रत्येक कुटुंबाने समोर आले पाहिजे असे मत बौद्ध उपासक तथा माजी श्रामणेर गौतम आगळे सर यांनी 69 व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या निमित्ताने दिनांक 02 आक्टोंबर गुरुवार रोजी त्रिरत्न बौद्ध विहार भिमवाडी येथील आयोजित कार्यक्रमाप्रसंगी व्यक्त केले.

यावेळी विचार पिठावर अनागारिका उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात तथागत गौतम बुद्धांच्या मुर्तीस पुष्प तर विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अगरबत्ती, मेणबत्ती प्रज्वलित करून करण्यात आली. या वेळी आगळे पूढे म्हणाले की आज देशभरात बौद्धगया येथील बौद्ध महाविहार मुक्ती आंदोलन

# रासेयो वैद्यनाथ कॉलेज मध्ये आपत्ती व्यवस्थापन कक्ष स्थापन

## ➲ प्रणव आघाव , अशिष मुंडे यांची समिती प्रमुख पदी निवड




परळी - वै : - वैद्यनाथ कॉलेजच्या एन. एस. एस. विभागाच्या अंतर्गत आपत्ती व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्यात आला असून त्यांचे उद्घाटन प्राचार्य डॉ. जगदीश जगतकर यांच्या हस्ते संपन्न झाले. पुरग्रस्त आपत्ती निवारण श्रमिक मदतनिस , शैक्षणिक क्षेत्रातील शाळा महाविद्यालियन विद्यार्थीना पुरग्रस्त परिस्थितिक सर्वेक्षण व त्यास शैक्षणिक अडचणी सोडवण्यास तसेच त्या परिसिरातील नैर्सगिक हनि मानसिक हनि या संदर्भत प्राचार्य डॉ. जगदीश जगतकर यांच्या मार्गदर्शक खाली एन. एस. एस. विभागचे प्रा. माधव रोडे एन. एस. एस. कार्यकमधिकरी प्रा. भिमानंद गजभारे , समाजशास्त्र प्रमुख प्रा.

# वडवणी बॉईज केंद्राची केंद्रस्तरीय शिक्षण परिषद उत्साहात संपन्न.

_वडवणी (प्रतिनिधी) शनिवार, दि 3 जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,साळिंबा या ठिकाणी वडवणी केंद्राची तिसरी केंद्रस्तरीय शिक्षण परिषद आज दि. 3 ऑक्टोबर 2025 रोजी अतिशय उत्साही वातावरणात संपन्न झाली. या परिषदेचे उद्घाटन वडवणी केंद्राचे केंद्रप्रमुख श्री करांडे साहेब यांच्या हस्ते करण्यात आले.या परिषदेला केंद्रप्रमुख श्री धायतिडक साहेब,केंद्रीय



मुख्याध्यापक श्री देशमुख साहेब,साळिंबा गावचे सरपंच श्री दिनेश नाईकवाडे साहेब,शा. व्य.स.अध्यक्ष श्री.सतिशजी खाडे साहेब,श्री.ह.भ.प.हरिदास महाराज सोळंके सर, शिक्षणप्रेमी श्री अंबादासजी जाधव साहेब, तज्ञ मार्गदर्शक श्री महादेव डोरले सर आणि श्री राजू दास राठोड ( मु.अ.साळिंबा ) इत्यादी मान्यवर उपस्थित होते......त्याच

## माजी खासदार स्वर्गीय केशरकाकू क्षीरसागर यांच्या पुण्यतिथी निमित्त नवगण महाविद्यालयात अभिवादन कार्यक्रम संपन्न



परळी वैजनाथ : माजी खासदार स्वर्गीय केशरकाकू क्षीरसागर यांच्या पुण्यतिथी निमित्त नवगण महाविद्यालयात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आबासाहेब हांगे, उपप्राचार्य डॉ. लालासाहेब घुमरे यांच्या मार्गदर्शना नुसार घेण्यात आला यावेळी विविध विभाग प्रमुख, प्राध्यापक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्वर्गीय क्षीरसागर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. डॉ.